ePaper

## 'सत्तेचा माज उतरवण्याची ताकद राज-उद्धव ठाकरेंमध्ये : संजय राऊत!

| वर्ष - 9 | अंक -140 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

**आतील पानांत**


- रिझवानने पाकिस्तानचं नाक कापलं
- कोणी केली 'गब्बर' ची शिकार?
- ममताच्या अडचणी वाढण्याची शक्यता
- सोमनाथ मंदिराचे 100 वर्ष पूर्ण


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 13 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

'मिसिंग लिंक'मुळे ३० मिनिटांची बचत | पुण्यात ५६ भूमिगत बोगद्यांचा महाप्रकल्प

# पुणे–मुंबई प्रवासात क्रांती!

## लोणावळा-खंडाळा घाट न चढता थेट पुण्याला जाण्याचा मार्ग खुला होणार

| पुणे / लोणावळा |
प्रतिनिधी | महाईन्यूज



**मुंबई–पुणे प्रवास करणाऱ्या लाखो वाहनचालकांसाठी दिलासादायक आणि ऐतिहासिक ठरणारी बातमी समोर आली आहे. अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडी, घाटातील अपघात आणि प्रवासातील विलंब यामुळे त्रस्त झालेल्या प्रवाशांसाठी आता नवा, वेगवान आणि सुरक्षित पर्याय उपलब्ध होणार आहे. लोणावळा–खंडाळा घाट न चढता थेट पुण्याला पोहोचण्याचा मार्ग 'मिसिंग लिंक' प्रकल्पाद्वारे लवकरच खुला होणार आहे.**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील हा बहुप्रतिक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्प अंतिम टप्प्यात असून येत्या काही महिन्यांत वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार असून, २५ ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. विशेषतः पावसाळा, सुट्ट्यांचे दिवस आणि सप्ताहअखेर होणारी प्रचंड वाहतूक कोंडी आता इतिहासजमा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### घाटातील वळणांना पूर्णविराम

सध्या लोणावळा–खंडाळा घाटातून प्रवास करताना तीव्र वळणं, उतार-चढाव आणि दाट धुके यामुळे अपघातांचा धोका वाढतो. अनेकदा वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना तासन्तास अडकून पडावं लागतं. मात्र १४ किमी लांबीचा 'मिसिंग लिंक' मार्ग सुरू झाल्यानंतर घाटातील अवघड प्रवास टाळता येणार आहे. सरळ, नियंत्रित आणि वेगवान मार्गामुळे प्रवास अधिक सुखकर ठरणार आहे.

### अभियांत्रिकीचा चमत्कार

'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ रस्ता नसून, तो अभियांत्रिकी कौशल्याचा उत्तम नमुना आहे. सह्याद्रीच्या अवघड पर्वतरांगांमध्ये १८० मीटर उंचीचा Keel-Stayed ब्रिज उभारण्यात आला असून, दोन भव्य बोगदेही तयार करण्यात आले आहेत. मुख्य बोगदा तब्बल ८.८७ किमी, तर दुसरा बोगदा १.६७ किमी लांबीचा आहे. सध्या बोगद्यांचं काम सुमारे ९८ टक्के पूर्ण झालं असून शेवटचा टप्पा लवकरच पूर्ण होणार आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर मुंबई–पुणे प्रवास केवळ वेगवानच नव्हे, तर अधिक सुरक्षित होणार आहे.

- ट्रॅफिक जामला कायमचा दिलासा?
- लोणावळा-खंडाळा घाटाला बायपास!
- 'मिसिंग लिंक'
- १४ किमी 'मिसिंग लिंक'मुळे अर्धा तास वाचणार

### पुण्यात भूमिगत वाहतुकीची क्रांती

दरम्यान, केवळ मुंबई–पुणे मार्गच नव्हे, तर पुणे शहरातील वाहतूक कोंडीवरही मोठा उपाय म्हणून राज्य सरकारने महत्वाकांक्षी भूमिगत बोगदा प्रकल्प हाती घेतला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच माहिती दिली की, पुण्यात तब्बल ५६ भूमिगत बोगदे बांधण्यात येणार आहेत.

येरवडा ते कात्रज या मार्गावर तयार होणारा हा प्रकल्प फक्त एक बोगदा नसून, उत्तर-दक्षिण पुण्याला जोडणारं ५४ किलोमीटरचं भूमिगत जाळं असणार आहे. या जाळ्यामध्ये जगताप डेअरी, सिंहगड रोड, पाषाण, कोथरूड, औंध, संगमवाडी, खडकी यांसारख्या प्रमुख आणि गजबजलेल्या भागांचा समावेश आहे.

### ट्रॅफिक जामला दिलासा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं की, "पुण्यातील ३२ प्रमुख रस्त्यांवर सध्या क्षमतेपेक्षा दीड ते अडीच पट वाहतूक आहे. भूमिगत बोगद्यांमुळे हा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. नागरिकांचा वेळ वाचेल, इंधनाची बचत होईल आणि प्रदूषणातही घट होईल."

## पुणे–आधुनिक वाहतूक शहराकडे

'मिसिंग लिंक' प्रकल्प आणि पुण्यातील भूमिगत बोगद्यांचं जाळं पूर्ण झाल्यानंतर पुणे केवळ आयटी, शिक्षण किंवा सांस्कृतिक शहर म्हणून नव्हे, तर आधुनिक आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्थेचं आदर्श मॉडेल म्हणून ओळखलं जाईल. कात्रज घाटातील कोंडीला अखेरचा निरोप मिळेल, शहरातील वाहतूक प्रवाह सुरळीत होईल आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, जलद व सोयीस्कर बनेल. मुंबई–पुणे मार्गावरून रोज प्रवास करणारे प्रवासी आणि पुणेकर आता या प्रकल्पांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची आतुरतेने वाट पाहत आहेत. कारण हा बदल केवळ रस्त्यांचा नसून, पुणे–मुंबई प्रवासाच्या अनुभवाचाच चेहरा बदलणारा ठरणार आहे.

'आप'च्या निर्धारपत्रात काय ?

मेट्रोच्या घोषणेवर पुण्यातील कार्यकर्ते आक्रमक

# पवारांकडून 'आप'ची नक्कल?

## पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अजित पवार आणि भाजपने आम आदमी पक्षाची (आप) नक्कल केली असून, 'मॉडेल स्कूल,' मोफत आरोग्य सुविधा आणि सार्वजनिक बस सेवांचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र त्यांना या योजना राबवायच्या नाहीत, अशी टीका 'आप'च्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केली. भाजप आणि राष्ट्रवादीची लढाई ही 'नुरा कुस्ती' असल्याची टीकाही त्यांनी केली.**



### राष्ट्रवादीची लढाई ही कुस्ती

'प्रदूषण, भ्रष्टाचार आणि पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाल्याने पुणेकर त्रस्त असून, गैरकारभारामुळे शहराचे वाटोळे झाले. आता दिल्ली आणि पंजाबप्रमाणे पुण्यातही जबाबदार, भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी 'आप'च्या उमेदवारांना निवडून द्या,' अशी साद घालत पक्षाचे प्रवक्ते मुकुंद किर्दत, शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे, सुरेखा भोसले, अक्षय शिंदे, सुभाष कारंडे, सुनील सवदी या पदाधिकाऱ्यांनी 'आप'चे निर्धारपत्र जाहीर केले.

'प्रदूषण, भ्रष्टाचार आणि पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाल्याने पुणेकर त्रस्त असून, गैरकारभारामुळे शहराचे वाटोळे झाले. आता दिल्ली आणि पंजाबप्रमाणे पुण्यातही जबाबदार, भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी 'आप'च्या उमेदवारांना निवडून द्या,' अशी साद घालत पक्षाचे प्रवक्ते मुकुंद किर्दत, शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे, सुरेखा भोसले, अक्षय शिंदे, सुभाष कारंडे, सुनील सवदी या पदाधिकाऱ्यांनी 'आप'चे निर्धारपत्र जाहीर केले.

"'आप'ने दिल्लीत आणि पंजाबमध्ये मॉडेल स्कूल, दर्जेदार आरोग्य सुविधा आणि मोफत बस प्रवास, अशा योजना राबविल्या. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्लीतील 'आप'च्या मॉडेल बघितले आहे. भाजपबरोबर त्यांनीही 'आप'च्या मॉडेलची नक्कल करत आपल्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. प्रत्यक्षात मात्र त्यांना या योजना राबवायच्या नाहीत. या दोन्ही पक्षांना ते शक्य नाही,' अशी टीका मुकुंद किर्दत यांनी केली.

गैरकारभाराकडून जबाबदार भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाकडे जाण्यासाठी बदल घडवूया, 'नक्कल नको, अस्सल आणा,' अशी सादही त्यांनी घातली.'पुण्यामध्ये आम आदमी पक्षाचे ८५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. हे सर्व कार्यकर्ते सुशिक्षित युवक आहेत.

त्यांच्या माध्यमातून पुणे शहराचा कायापालट होऊ शकतो. महापालिकेत निवडून आल्यास कोणालाही गैरकारभार करू देणार नाही.

नागरिकांच्या करातून जमा होणारा पैसा योग्य ठिकाणी, पारदर्शी पद्धतीने खर्च केला जाईल,' असे सुदर्शन जगदाळे यांनी नमूद केले. त्यांनी पुण्यातील नागरी समस्यांची समस्यांची यादी वाचत भाजप आणि राष्ट्रवादीवर टीका केली.

'रोजगार उपलब्ध करणारे धोरणात्मक निर्णय, दिल्ली आणि पंजाबच्या धर्तीवर महिलांना मोफत बस प्रवास, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने मिसिंग लिंक रस्ता, महापालिकेच्या शाळेत उच्च दर्जाच्या सुविधा आणि माफक दरात शिक्षण, पाचशे मीटर अंतरात मोफत प्राथमिक आरोग्य सुविधा देणारे मोहल्ला क्लिनिक, 'महापालिका तुमच्या दारात' या योजनेतून नागरिकांना घरपोच कागदपत्रे, प्रत्येक घराला पुरेसे पाणी, भयमुक्त शहर आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना,' अशी आश्वासने 'आप'ने निर्धारपत्रातून दिली. अजित पवार आणि भाजपने आम आदमी पक्षाची (आप) नक्कल केली असून, 'मॉडेल स्कूल,' मोफत आरोग्य सुविधा आणि सार्वजनिक बस सेवांचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र त्यांना या योजना राबवायच्या नाहीत, अशी टीका 'आप'च्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केली. भाजप आणि राष्ट्रवादीची लढाई ही 'नुरा कुस्ती' असल्याची टीकाही त्यांनी केली.

# 'ईव्हीएम हलगर्जीपणा झाल्यास कारवाई

## आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिला इशारा

। 'पिंपरी-चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. ही मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे. मतदान यंत्रांची (ईव्हीएम) हाताळणी आणि वाहतूक यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा केल्यास कारवाई केली जाईल,' असा इशारा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिला.**



### 'प्रचार थांबताच फलक, झेंडे काढा

मतदान प्रक्रिया ही संवेदनशील बाब असून प्रत्येकाने जबाबदारीने काम करावे. मतदानाचा लेखोजोखा अत्यंत बारकाईने संकलित करावा. अभिरूप मतदान (मॉक पोल) व्यवस्थित घेऊन राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या नमुन्यानुसार त्याचे प्रमाणपत्र तयार करण्यात यावे.''प्रचार थांबताच फलक, झेंडे काढा' 'महापालिका निवडणुकीच्या जाहीर प्रचाराची मुदत आज (मंगळवारी) सायंकाळी साडेपाच वाजता संपणार आहे. त्यानंतर उमेदवार, पक्ष यांच्या जाहीर प्रचाराचे फलक, झेंडे, पोस्टर्स संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी तातडीने हटवावेत,' अशा सूचनाही आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या.

निगडी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे निवडणूक कामकाजाविषयक सोमवारी आढावा बैठक आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्या वेळी ते बोलत होते. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, निवडणूक निर्णय अधिकारी हिम्मत खराडे, अर्चना तांबे, अनिल पवार, दीप्ती सूर्यवंशी, नितीन गवळी, सुप्रिया डांगे, अर्चना पठारे, पल्लवी घाडगे यावेळी उपस्थित होते. आयुक्त हर्डीकर म्हणाले, 'जाहीर प्रचार थांबल्यानंतर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया संपेपर्यंतचा कालावधी महत्त्वाचा आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच कोणताही अनुसूचित प्रकार होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनासोबत समन्वय साधून बारकाईने लक्ष ठेवावे. या काळात आचारसंहिता कक्षाने प्रभावीपणे विविध पथके कार्यरत ठेवावीत. मतदार चिठ्ठ्या मतदारांपर्यंत वाटप करण्याचे काम पूर्ण करावे.मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचारी तसेच मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक असणारे साहित्य मतदान केंद्रावर घेऊन जाण्यासाठी वाहतुकीचे नियोजन करावे. प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडत असताना आवश्यक बाबींची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना द्यावी.

राजकीय आरोप-प्रत्यारोप

भाजपाची वाढती क्रेझ : राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत

# दिघीतील पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश!

## मिशन- PCMC : दिघीत राजकीय समीकरणे बदलली; राष्ट्रवादीला मोठा धक्का

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड | पिंपरी-चिंचवड शहरात विकासाच्या मुद्द्यावर अजितदादा पवार आणि आमदार महेशदादा लांडगे यांच्यात सुरू असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला मोठा धक्का बसला आहे. दिघी येथील राष्ट्रवादीच्या माजी व विद्यमान पदाधिकाऱ्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत आज आमदार महेशदादा लांडगे आणि भाजपचे ज्येष्ठ नेते श्री दत्तात्रय आबा गायकवाड यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.**



शहरात मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस गटाला गळती लागल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी तब्बल २२ माजी नगरसेवकांसह असंख्य पदाधिकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला होता. त्यानंतर दिघी परिसरातून दत्तात्रय आबा गायकवाड यांचे चिरंजीव श्री उदय गायकवाड यांच्या सहकार्याने आणि कार्तिक लांडगे यांच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने युवा कार्यकर्ते भाजपात दाखल झाले.

याशिवाय दत्तात्रय आबा गायकवाड यांचे शिष्य मानले जाणारे उबाठा गटाचे विभाग प्रमुख संतोष वाळके यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजपाची वाट धरल्याने दिघीतील राजकीय समीकरणे बदलू लागली आहेत. यामुळे येथील आगामी निवडणूक एकतर्फी होण्याचे संकेत याआधीच मिळाले होते.

या राजकीय घडामोडींना आणखी वेग देत आज राष्ट्रवादी काँग्रेस गटातील मातब्बर पदाधिकारी श्री प्रशांत कलाल आणि श्री सचिन दुबळे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. प्रभाग क्रमांक ०४ दिघी येथील राष्ट्रवादीचे उमेदवार श्री चंद्रकांत वाळके यांच्याविषयी असलेल्या नाराजीमुळे आपण पक्षाला सोडचिठ्ठी देत असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे 'तगडे उमेदवार' म्हणून ओळखले जाणारे चंद्रकांत वाळके यांच्यापुढील आव्हाने वाढली असून यंदाही त्यांच्या पदरी निराशा येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पॅनल प्रमुख म्हणून भूमिका बजावणाऱ्या वाळके यांचा पराभव अटळ दिसू लागल्याने त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांची साथ सोडल्याचे चित्र परिसरात दिसून येत आहे. परिणामी राष्ट्रवादी काँग्रेसचे अन्य उमेदवारही अस्वस्थ स्थितीत असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, भारतीय जनता पक्षाचा वाढता प्रभाव, विकासाची स्पष्ट दूरदृष्टी, आमदार महेशदादा लांडगे यांची प्रभावी संघटन शैली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रचार दौरा तसेच दिघीतील युवा नेतृत्व म्हणून उदयास येत असलेले श्री उदय गायकवाड यांची पारदर्शक कार्यपद्धती यामुळे प्रभाग क्रमांक ०४ मधील भाजपचे चारही उमेदवार विजयी होतील आणि भाजपाची परंपरा कायम राहील, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# पिंपरी-चिंचवडचा स्वतंत्र जिल्हा

## सरकारी कार्यालयाचे विकेंद्रीकरण; कल्याणकारी योजनांसाठी विशेष कृती दल स्थापन होणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडचा स्वतंत्र 'शिवनेरी' जिल्हा, सरकारी कार्यालयाचे विकेंद्रीकरण, मेट्रोचा विस्तार, उच्च दाबाने पाणीपुरवठा आणि कल्याणकारी योजनांसाठी विशेष कृती दल स्थापन करण्यासह विविध आश्वासनांचा जाहीरनामा भारतीय जनता पक्षाने प्रसिद्ध केला आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराचा 'संकल्प शाश्वत विकासाचा' या घोषवाक्यासह शहरासमोरील आव्हाने सोडविण्याचा संकल्प जाहीरनाम्यात केला आहे. २०३२ पर्यंत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र लोकसभा मतदारसंघाची मागणी, विधानसभा मतदारसंघाच्या सीमांची पुनर्रचना करून शहराच्या विकासाला राष्ट्रीय स्तरावर प्राधान्य मिळवून दिले जाईल. स्वतंत्र 'शिवनेरी' जिल्ह्याची निर्मिती केली जाईल.

सरकारी कार्यालयाचे विकेंद्रीकरण केले जाईल. एमआयडीसी, महावितरण आणि टपाल विभागाची स्वतंत्र स्थानिक मुख्य कार्यालये शहरात स्थापन केली जातील. शहरातील सहा हजारांहून अधिक गृहनिर्माण संस्थांच्या सोयीसाठी पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र निबंधक कार्यालयाची मागणी केली जाईल. प्रत्येक प्रभागात एक एकात्मिक केंद्र सुरू केले जाईल. तेथे महापालिका, राज्य व केंद्र सरकारच्या सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळतील. पिंपरी किंवा मोशी येथे एकात्मिक प्रशासकीय विशेष क्षेत्र (क्लस्टर) उभारले जाईल.

### प्रचारात महिला वर्ग व्यस्त

कल्याणकारी योजनांसाठी विशेष कृती दल स्थापन केला जाईल. महापालिका निगडित सेवा 'सारथी' हेल्पलाइनशी जोडून योजनांची माहिती डिजिटल डॅशबोर्डवर पाहता येईल. स्मार्ट सिटी मिशन किंवा शहर परिवर्तन कार्यालयाच्या माध्यमातून तंत्रज्ञानांची जोड देऊन नवनवीन उपक्रम सुरू ठेवले जातील. तरुणांना सरकारी कामात रोजगाराच्या नवीन संधी दिल्या जातील.

'स्मार्ट फॅमिली ॲप' सुरू करण्यात येईल. त्यातून कचरा वर्गीकरण, सौर ऊर्जा वापर आणि वाहतूक शिस्त पाळणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन दिले जाईल. चांगले गुण मिळवणाऱ्या कुटुंबांना मालमत्ता करात सवलत आणि विशेष सन्मान, बक्षिसे दिली जातील. भटक्या श्वानांचे लसीकरण आणि निर्बीजीकरण केले जाईल. रुग्णालयांचे जाळे, नद्यांचे पुनरुज्जीवन केले जाईल, अशी आश्वासने भाजपने दिली आहेत.

### पाणीपुरवठा निश्चित असल्यानंतरच बांधकाम परवानगी

नवीन गृहनिर्माण सोसायट्यांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी कडक धोरण लागू केले जाईल. ज्या प्रकल्पांना पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित असेल, त्यांनाच बांधकाम परवानगी दिली जाईल, असे आश्वासनही भाजपने दिले आहे.

### मेट्रो मार्गाचा विस्तार

मेट्रो मार्गाचा विस्तार केला जाईल. यात निगडी-वाकड-चाकण मार्गाला मंजुरी मिळवून काम सुरू केले जाईल. निगडी ते वाघोली मार्गे चिखली-मोशी-चऱ्होली, निगडी ते चाकण मार्गे तळवडे, पुणे विमानतळ ते आळंदी मार्गे दिघी-चऱ्होली, हिंजवडी टप्पा तीन ते चिखली मार्गे डांगे चौक, पिंपरी कॅम्प-चिंचवड स्टेशन तसेच पुणे विद्यापीठ ते देहूरोड मार्गे औंध-सांगवी-डांगे चौक-रावेत, नाशिक फाटा- भोसरी-चाकण अशा नवीन मेट्रो मार्गाचा विस्तृत प्रकल्प आराखडा (डीपीआर) केला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# घायकुतीच्या भूमिकेतली ‘मुभा’ दुटप्पी...




**लेखनाच्या पलीकडे जाऊन लेखकांनी सार्वजनिक जीवनात वावरताना भूमिका घ्यावी का, हा अलीकडे सतत चर्चेत असलेला प्रश्न. भारतीय राजकारण व त्यातून उदयाला येणाऱ्या सत्ताकारणाचा लंबक मध्यम व डावीकडून थेट उजवीकडे वळला व या प्रश्नाची धार अधिक तीव्र झाली. कुणी कितीही नाही म्हटले तरी राजकारण आणि सत्ताकारणाचे पडसाद समाजजीवनावर पडत असतात.**

उठणाऱ्या धुरळ्यात लेखकांनीही भूमिका घ्यावी, न्याय व सत्याची बाजू उचलून धरावी या अपेक्षेत तसे काही गैर नाही. मात्र ती घेताना अंतर्विरोधाचे दर्शन होणार नाही याची काळजी साहित्यसेवेला वाहून घेणाऱ्या साऱ्यांनी घेणे गरजेचे. अलीकडच्या १०/११ वर्षांचा विचार केला तर तसेच घडते आहे की त्यापेक्षा वेगळे काही, हाही अलीकडे वारंवार उपस्थित होणारा प्रश्न. त्याचे उत्तर लेखकांच्या सोयीच्या भूमिकांमध्ये व निवडक नैतिकतेत दडलेले. आता पुन्हा हा मुद्दा चर्चेला आला तो राज्यातील काही प्रागतिक विचाराच्या लेखकांनी शरद पवार व अदानी संबंधांवरून घेतलेल्या भूमिकेनंतर. काही दिवसांपूर्वी अदानी बारामतीत गेले व पवार माझे गुरू असे म्हणाले. अदानी हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या गळ्यातले ताईत, सारे प्रकल्प त्यांनाच मिळतात व त्यासाठी कायदे वाकवले जातात असा आरोप



सातत्याने होतो. या पार्श्वभूमीवर पवारांनी त्यांच्याशी उघडपणे राखलेले संबंध या लेखकांच्या पुरोगामित्वाला धक्का देणारे ठरले व त्यांनी पवारांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या अभ्यासवृत्तीच्या मार्गदर्शक मंडळातून स्वतःला दूर केले.

नितीन रिंढे, राजीव नाईक, गणेश विसपुते, किरण येले, मुकुंद कुळे, रणधीर शिंदे, चंद्रशेखर फणसाळकर, प्रमोद मुनघाटे व शरद नावरे ही या साहित्यिकांची नावे. स्वतःला पुरोगामी म्हणणाऱ्या पवारांनी अदानीला जवळ करायला नको; हे असे जवळ करणे म्हणजे आमचा विरोध असलेल्या सध्याच्या सत्तेला व त्यांच्या विचारसरणीला बळ देणे- असे या साऱ्यांचे मत. त्याचा आदर व्हायला हवा. मात्र या लेखकांची ही भूमिका अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरते त्याचे काय?

शरद पवारांनी अदानींशी असलेले संबंध कधीही लपवून ठेवलेले नाहीत. याआधीही अदानी कित्येकदा बारामतीत येऊन गेले. हे ठाऊक असूनही या लेखकांनी पवारांच्या संस्थेत काम करण्याचा प्रस्ताव स्वीकारला कसा? मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रातर्फे शरद पवारांच्या नावाने दिली जाणारी अभ्यासवृत्ती आजवर अनेकांना दिली गेली. ही प्रक्रिया राबवताना सरकारविरुद्ध लिहू नका असा दबाव शरद पवार हे अध्यक्ष असलेल्या यशवंतराव चव्हाण केंद्राकडून या मार्गदर्शकांवर वा अभ्यासवृत्तीधारकांवर कधी आला होता काय? नसेल तर आताच्या अदानी भेटीचे निमित्त करून अशी भूमिका घेण्याचे कारण काय?इथे पवारांची भूमिका योग्य की अयोग्य हा मुद्दाच गौण. पवारांचे आजवरचे राजकारण नेहमी तळ्यातमळ्यात असेच राहिले आहे.

ते विश्वसनीय नाहीत असा आरोपही अनेकदा झालेला आहे. संसदेत त्यांच्या खासदारांनी विरोधी पक्षापासून फारकत घेत कैक प्रसंगात सरकारला अनुकूल अशी भूमिका घेतली. हे डोळ्यांना दिसत असताना हे लेखक वेळोवेळी गप्प का राहिले? तेव्हा ते मार्गदर्शक मंडळावर नव्हते असे गृहीत धरले तरी पवारांची ‘ऑफर’ स्वीकारण्याआधी ही पार्श्वभूमी या लेखकांनी विचारात का घेतली नाही? अलीकडे सरकारला विरोध या मुद्द्यावर अनेक पुरोगामी व्यक्ती व लेखकांना ‘शहीद’ होण्याचा छंद जडला आहे. यातून बऱ्यापैकी नावलौकिक मिळतो. या लेखनबाह्य प्रकाराने प्रसिद्धीही मिळते. त्यातून ही कृती घडली असे आता समजायचे काय? आम्हाला सरकारपासून अंतर राखायचे आहे.

त्यांची विचारसरणी व धर्मनिरपेक्षतेला तडा देणारी, अभिव्यक्तीचा संकोच करणारी भूमिका आम्हाला मान्य नाही हे या साहित्यिकांचे किंवा अशीच भूमिका घेणाऱ्या अन्य लेखकांचे म्हणणे. ते त्यांच्या पातळीवर योग्यही असू शकते. मग याच भूमिकेचा आदर करत हे लेखक सरकारी समित्यांचा, मंडळांचा, अकादमीवरील सदस्यत्वाचा त्याग का करत नाहीत? याच लेखकांच्या यादीतील काही जण साहित्य संस्कृती मंडळ व साहित्य अकादमीवर एक तर आजही आहेत

## प्रासंगिक »

### भिकेला लागू या!

***राज्यावर मोठे कर्ज. अर्थसंकल्पानंतर लगोलग पुरवणी मागण्या सुरू होतात अशी स्थिती. तरीही महापालिका निवडणुकांसाठी विचारशून्य आश्वासने दिली जातात...***

एखादा मुद्दा सरकारच्या ‘विचाराधीन’ आहे, यासारखा अतिशयोक्त विनोदाचा दुसरा नमुना नाही, हे पुलंचे उद्गार. म्हणजे सरकार विचार करते हाच विनोद असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ. आता हा विनोद दुहेरी ठरेल. म्हणजे सरकार विचार करत नाही ते नाहीच; पण नागरिकही विचार करण्याची क्षमता गमावून बसलेत किंवा कसे असा प्रश्न पडावा अशी स्थिती. ती अर्थातच एका रात्रीत आलेली नाही. ही प्रक्रिया बराच काळ सुरू असणार. पण सध्या मात्र नागरिकांची ही विचारशून्यता अनुभवण्यासाठी सुगीचा काळ म्हणावा लागेल. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या निमित्ताने जे वास्तव समोर येताना दिसते त्यातून नागरिकांची ही गोमटी विचारशून्यता उठून दिसते. या निवडणुकांची घोषणा झाली आणि राजकारण्यांतील प्रवासी-पक्षी दाणापाण्याच्या शोधात निघाले.

बदलत्या युगात जीवनावश्यक वस्तू बनलेल्या स्मार्टफोन अर्थात भ्रमणध्वनी ग्राहकांची प्रचंड बाजारपेठ असलेल्या भारताला लवकरच स्मार्टफोन निर्मितीचे जगातील अव्वल केंद्र बनण्याची स्वप्ने भारत सरकार दाखवत आहे. तशी महत्त्वाकांक्षा बाळगून पावलेही उचलली जात आहेत.

## पाळतशाही प्रयत्नांचा आता दुसरा अंक?

पण ही पावले अडखळू शकतील अशा उपाययोजनांची चर्चा आणि संभाव्य सक्तीची चाहूल लागल्यामुळे बड्या आंतरराष्ट्रीय स्मार्टफोन निर्मिती कंपन्याही सावध झाल्या आहेत. ‘स्मार्टफोन कंपन्यांनी त्यांच्या हँडसेट निर्मिती आराखड्याची संकेतसंहिता अर्थात सोर्स कोडविषयी माहिती सरकारला पुरवावी, जेणेकरून ऑनलाइन गैरव्यवहार आणि अनधिकृत विदा गळती असे प्रकार टाळण्याकामी किंवा त्यांची चौकशी करण्यासाठी सरकारला मदत होईल’- अशी सरकारची नवी मागणी असल्याचे या कंपन्या सांगताहेत. भारत हा स्मार्टफोनची जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत मोठी बाजारपेठ आहे हे मान्य. या देशात डिजिटल व्यवहार लक्षणीयरीत्या वाढत आहे हेही मान्य. या घडामोडी विकसित आणि प्रगतिपथावरील भारताची व्यवच्छेदक लक्षणे म्हणून मिरवल्या जात असतील, तर आता सरकार जे काही करू पाहात आहे ते विकसित, प्रगतिशील जगाचे लक्षण खचितच नाही.



चोऱ्यांचे प्रमाण वाढते म्हणून घरटी एक पोलीस तैनात करणे हे शहाणपणाचे कसे म्हणता येईल? तशात यासंबंधी हँडसेट उत्पादक कंपन्यांशी बोलणी करण्याची जबाबदारी केंद्र सरकारने दूरसंचार खात्याकडून इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान खात्याकडे वळवली असल्याचे वृत्त ‘रॉयटर्स’ने दिले आहे. यात सरकारच्या सोयीचा भाग किती आणि दूरसंचार खात्यावरील अविश्वासाचा भाग किती हे स्पष्ट नाही. गेल्याच महिन्यात ‘संचार सारथी’ हे उपयोजन किंवा ॲप नवीन हँडसेटमध्ये अनिवार्य करण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला. तो सॉफ्टवेअर प्रकारातील होता. त्याही वेळी सरकारने काही माहिती प्रसृत करण्याआधी ‘रॉयटर्स’नेच त्याविषयी वाच्यता केली. थेट संसदेत गदारोळ झाल्यानंतर सरकारने तो प्रस्ताव साळसूदपणे मागे घेतला. त्यावेळी ‘लोकसत्ता’नेही “सेन्सॉर’ साथी?’ (३ डिसेंबर) या अग्रलेखातून त्या प्रस्तावाचा समाचार घेतला होता. आता प्रस्तुत बदल हा निर्मितीशी निगडित म्हणजे हार्डवेअर प्रकारातील आहे. सुरक्षित मोबाइल संच म्हणजेच सुरक्षित सायबर व्यवस्था आणि सायबर अपराधमुक्त समाजनिर्मिती असते असा सरकारचा गैरसमज झाला असावा. यातूनच मोबाइलनिर्मिती कंपन्यांनी त्यांचा ‘सोर्स कोड’ सरकारला अवगत करावा व सॉफ्टवेअर अपडेट म्हणजे प्रणाली अद्यायावतीकरणाबाबत सरकारला आगाऊ सूचित करावे, यासारख्या मुद्द्यांवर व्यापक चर्चा जगभरातील सरकार आणि कंपन्यांमध्ये होत असतात. त्या निकोप आणि परस्परांचा आब राखत विधायक स्वरूपाच्या असाव्यात ही अपेक्षा असते. भारत सरकारने मात्र तब्बल ८३ सुरक्षा मानकांचा प्रस्ताव तयार केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## उमेदवारांना १५ कोटींची ऑफर

## फडणवीसांचं 'ते' वक्तव्य भर सभेत ऐकवलं

# राजचा पुन्हा एकदा 'लाव रे तो व्हिडीओ'!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. आज राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची ठाणे शहरात संयुक्त सभा पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरेंनी महायुतीच्या नेत्यांवर गंभीर आरोप केले.**

### फडणवीस मला बरा माणूस वाटायचा



यावेळी राज ठाकरे यांनी आज पुन्हा एकदा 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत भाजपा नेते अण्णामलाई यांनी मुंबईबाबत केलेल्या वक्तव्याचा व्हिडीओ भर सभेत ऐकवला. तसेच अण्णामलाई यांनी केलेल्या वक्तव्यावर देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या प्रतिक्रियेचाही व्हिडीओ भर सभेत ऐकवला. देवेंद्र फडणवीस मला बरा माणूस वाटायचा, आत्ता आत्तापर्यंत बरे वाटायचे. पण कितीही खोटं बोलत आहेत. ते अण्णामलाई आले होते आणि मुंबई महाराष्ट्राचं शहरच नाही बोलले. तरीही देवेंद्र फडणवीस म्हणतात की अण्णामलाई असं काही बोललेच नाही. किती हवं तेवढं देवेंद्र फडणवीस खोटं बोलत आहेत. अण्णामलाई सांगत आहे की मुंबईचा आणि महाराष्ट्राचा काही संबंध नाही. तरी फडणवीस म्हणतात त्यांच्या वक्तव्याचा तो अर्थच होत नाही. मला वाटायचं की फडणवीसांना इंग्रजी समजतं. पण खोटं बोलत राहायचं", असं म्हणत राज ठाकरे यांनी टीका करत देवेंद्र फडणवीस आणि अण्णामलाई यांच्या वक्तव्याचा व्हिडीओ ऐकवला."एका प्रभागातील एकाच कुटुंबातील तीन उमेदवारांना १५ कोटींची ऑफर दिली गेली होती.

१५ कोटींची ऑफर त्या कुटुंबातील तीन जणांनी नाकारली. दुसऱ्या एका महिला उमेदवाराला उमेदवारी मागे घेण्यासाठी ५ कोटींची ऑफर दिली गेली होती. आणखी एका उमेदवाराला १ कोटींची ऑफर दिली गेली होती. म्हणजे कुणाला १ कोटी, कुणाला ५ कोटी, कुणाला १० कोटी, कुणाला १५ कोटींची ऑफर दिली गेली", असा खळबळजनक आरोप राज ठाकरे यांनी महायुतीवर केला आहे.देवेंद्र फडणवीस हे सगळं तुम्ही कुणासाठी करताय? पण काल मी म्हटलं ना की हे फक्त ससाणे आहेत, जाऊन फक्त पक्षीच मारून आणायचे आहेत यांना. मी त्या गौतम अदाणीचं प्रकरण काढलं, काय मिरच्या झोंबल्या.

पुढे काय सुरू केलं? माझ्या आणि गौतम अदाणींचा फोटो, माझ्या घरी गौतम अदाणी येऊन गेलेत, रतन टाटा येऊन गेले आहेत, मुकेश अंबानी येऊन गेले आहेत, चित्रपटातले कलाकारही येऊन गेले आहेत. मग? माझ्या घरी येऊन गेले म्हणून यांची पापं झाकायची का मी?", असा सवाल राज ठाकरेंनी केला.गौतम अदाणी घरी आले होते काहीतरी दोन ते तीन वर्षांपूर्वी आले होते. आता घरी आले होते तर काय करु?

हाकलून देऊ? शिवाय अदाणींशी दोस्ती करण्याइतका अडाणी मी नाही", असंही राज ठाकरेंनी म्हटलं. "आमचं गुजराती लोकांशी, समाजाशी भांडण नाही. जे काही डाव रचत आहेत त्या विरोधात इथल्या गुजराती समाजाने बोललं पाहिजे", असं राज ठाकरेंनी म्हटलं आहे. "नवी मुंबईचा विमानतळ सोडल तर अदाणीने एकही विमानतळ बांधलेलं नाही. जी विमानतळं घेतली आहेत ती सगळी गन पॉईंटवर चालवायला घेतली आहेत. पोर्टचंही तेच, गुजरातमधलं मुंद्रा पोर्ट बांधलं आहे, इतर पोर्ट गन पॉईंटवर चालवायला घेतली आहेत", असा गंभीर आरोप राज ठाकरेंनी केला.भाजपाचे नेते के.अण्णामलाई प्रचारादरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत म्हणाले की, "मुंबईच्या लोकांना ट्रिपल इंजिन सरकार हवं आहे. तुम्ही चेन्नई शहरात पाहिलं तर तिथे डीएमकेची सत्ता आहे आणि केंद्र भाजपा. बंगळुरू आणि हैदराबादमध्येही खाली काँग्रेस आणि वर भाजपा आहे. मुंबई असं एकमेव शहर आहे, जिथे ट्रिपल इंजिन सरकार शक्य आहे."

### सभेत ऐकवला 'तो' व्हिडीओ

के.अण्णामलाई म्हणाले होते की, "बॉम्बे हे महाराष्ट्राचं शहर नाही. हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. या शहराच्या मनपाचं बजेट ७५ हजार कोटी आहे. चेन्नई ८ हजार आणि बंगळुरूचं बजेट १९ हजार कोटी आहे. त्यामुळे या शहराचं नियोजन करण्यासाठी चांगल्या लोकांची गरज आहे.महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत.

# मुलगा रशीदमामूसह बसायला लागला

## बाळासाहेब ठाकरे स्वर्गातून पाहात असतील त्यांना काय वाटत असेल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईसह महापालिकांचा प्रचार जोरात सुरु आहे. १३ तारखेला म्हणजेच मंगळवारी प्रचाराच्या तोफा थंडावतील. १५ जानेवारीला निवडणूक पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. या निकालामध्ये नेमकं काय होतं याकडे महराराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.**

शिवाजी पार्क मैदानावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची संयुक्त सभा रविवारी पारड पडली. तर आज (सोमवार) शिवाजी पार्क मैदानावर महायुतीची सभा झाली. देवेंद्र फडणवीस हिंदू आहेत का? असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला होता त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे. खोटं बोल पण रेटून बोल ही तुमची (उद्धव ठाकरे) पद्धत आहे. त्याचा पर्दाफाश करायला आम्ही आलो आहोत. शेजाऱ्याचं पोरगं मांडीवर बसवता आणि आमचं पोरगं म्हणून सांगता. विकासावर बोलायचं असेल तर मर्द व्हावं लागतं. आता कुणामधे मर्दानगी आहे की नाही हे बोलणारा मी नाही, माझे ते संस्कारही नाहीत. पण माझ्या आई वडिलांपर्यंत तुम्ही पोहचलात. माझ्या आई वडिलांवर बोललात. अरे शरम वाटली पाहिजे." असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.यानंतर देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मला एका गोष्टीचा अभिमान आहे मी त्या बापाचा पोरगा आहे जो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रचारक होता. मी त्या बापाचा पोरगा आहे ज्या बापाने दोन वर्षे इमर्जन्सी असताना तुरुंगात काढली. मी त्या बापाचा पोरगा आहे ज्याने आपलं जीवन संघर्षात घालवलं, कधी संपत्ती कमवली नाही. माझा बाप स्वर्गातून मला पाहात असेल तेव्हा त्यांनाही अभिमान वाटत असेल की माझं हिंदुत्व माझ्या मुलाने चालवलं. पण तुमचे पिताश्री हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वर्गातून पाहात असतील त्यावेळी त्यांना काय वाटत असेल? आता माझा मुलगा रशीद मामूसह बसायला लागला हे पाहिल्यानंतर त्यांना काय वाटत असेल? तुम्ही कितीही खोटं बोला तरीही या जनतेचा तुमच्यावर विश्वास नाही."असं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना दिलं आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक, महापौर कोण होणार? याची सुरुवात कुणी केली? आम्ही म्हणतोय मराठी महापौर होणार, ते म्हणतात हिंदू महापौर होणार. देवेंद्र फडणवीस हिंदू आहेत की नाही? जरा तपासून बघा, डोकं वगैरे किंवा बर्थ सर्टिफिकेट वगैरे. आम्ही अस्सल मराठी बोलणारे हिंदू आहोत.



### उद्धव ठाकरे काय म्हणाले होते?

मुंबईसह महापालिकांचा प्रचार जोरात सुरु आहे. १३ तारखेला म्हणजेच मंगळवारी प्रचाराच्या तोफा थंडावतील. १५ जानेवारीला निवडणूक पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. या निकालामध्ये नेमकं काय होतं याकडे महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

## शोध मोहिमेत जबरदस्तीने हस्तक्षेप ईडी अधिकाऱ्यांना रोखण्याच्या प्रयत्न

# ममताच्या अडचणी वाढण्याची शक्यता

## २,७४२ कोटी कोळसा घोटाळा



| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या अडचणी वाढत असल्याचे दिसून येत आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ED) त्यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. या याचिकेत ममता बॅनर्जी यांनी तीन ईडी अधिकाऱ्यांना धमकावण्यात आले आणि धमकावण्यात आल्याचा आरोप आहे. ८ जानेवारीला कोलकातात टाकण्यात आलेल्या ईडीच्या धाडीशी संबंधित आहे. ई येथे करण्यात आलेल्या शोध मोहिमेशी संबंधित आहे, ज्या दरम्यान ईडी अधिकाऱ्यांवर गैरवर्तन करण्यात आले.**

कोलकाता येथे शोध ईडीच्या कारवाईदरम्यान ममता बॅनर्जी ( MAMATA BANERJEE) यांनी ईडी अधिकाऱ्यांना चुकीच्या पद्धतीने रोखण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कामात अडथळा आणण्यात आला, असा ईडीचा आरोप आहे. पश्चिम बंगाल सरकार आणि ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध ही याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेत, ममता बॅनर्जी, डीजीपी राजीव कुमार आणि सीपी मनोज वर्मा यांनी ईडीच्या कारवाईदरम्यान त्यांच्या कामकाजात अडथळा आणण्याचा आणि प्रभावित करण्याचा कट रचल्याचा आरोप करण्यात आला आहे.ममता बॅनर्जी यांनी २,७४२ कोटी रुपयांच्या कोळसा घोटाळ्यासंदर्भात ८ जानेवारी रोजी झालेल्या शोध मोहिमेत जबरदस्तीने हस्तक्षेप केला. ममता बॅनर्जी आणि इतर राज्य अधिकाऱ्यांनी सीबीआय आणि ईडीच्या कार्यवाहीत अडथळा आणला आणि कारवाईला विरोध केल्याचाही आरोप ईडीच्या याचिकेत करण्यात आला आहे. याशिवाय तृणमूल काँग्रेस (TMC) समर्थकांनी उच्च न्यायालयाच्या कामकाजात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे, तृणमूल काँग्रेस समर्थकांनी गोंधळ घडवून आणला. मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी सुमारे १०० पोलिसांसह प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी घुसल्या आणि ईडीने जप्त केलेले लॅपटॉप, मोबाईल फोन आणि कागदपत्रे जबरदस्तीने ताब्यात घेतली, असाही आरोप आहे.पश्चिम बंगालमधील कथित कोळसा घोटाळ्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ED) सर्वोच्च न्यायालयाकडे मोठी मागणी केली आहे. ईडीने मुख्यमंत्री बॅनर्जी, राज्याचे पोलिस महासंचालक (डीजीपी) राजीव कुमार आणि कोलकात्याचे पोलिस आयुक्त मनोज वर्मा यांच्याविरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) एफआयआर नोंदवून चौकशी सुरू करण्याची विनंती केली आहे. या प्रकरणाची सध्या ईडी आणि सीबीआय दोन्ही संस्थांकडून चौकशी सुरू असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील कारवाईची दिशा ठरणार आहे. मात्र, या घडामोडीमुळे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांच्या सरकारसमोर नव्या राजकीय व कायदेशीर आव्हानाचे संकट उभे राहिल्याचे मानले जात आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या अडचणी वाढत असल्याचे दिसून येत आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ED) त्यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. या याचिकेत ममता बॅनर्जी यांनी तीन ईडी अधिकाऱ्यांना धमकावण्यात आले आणि धमकावण्यात आल्याचा आरोप आहे. ८ जानेवारीला कोलकातात टाकण्यात आलेल्या ईडीच्या धाडीशी संबंधित आहे. ई येथे करण्यात आलेल्या शोध मोहिमेशी संबंधित आहे, ज्या दरम्यान ईडी अधिकाऱ्यांवर गैरवर्तन करण्यात आले. कोलकाता येथे शोध ईडीच्या कारवाईदरम्यान ममता बॅनर्जी ( MAMATA BANERJEE) यांनी ईडी अधिकाऱ्यांना चुकीच्या पद्धतीने रोखण्याच्या प्रयत्न केला. त्यांच्या कामात अडथळा आणण्यात आला, असा ईडीचा आरोप आहे. ईडीच्या कारवाईदरम्यान त्यांच्या कामकाजात अडथळा आणण्याचा आणि प्रभावित करण्याचा कट रचल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### जबरदस्तीने हस्तक्षेप केला

ममता बॅनर्जी यांनी २,७४२ कोटी रुपयांच्या कोळसा घोटाळ्यासंदर्भात ८ जानेवारी रोजी झालेल्या शोध मोहिमेत जबरदस्तीने हस्तक्षेप केला. ममता बॅनर्जी आणि इतर राज्य अधिकाऱ्यांनी सीबीआय आणि ईडीच्या कार्यवाहीत अडथळा आणला आणि कारवाईला विरोध केल्याचाही आरोप ईडीच्या याचिकेत करण्यात आला आहे.

## गुजरातमधील सोमनाथ मंदिराचे 100 वर्ष पूर्ण

# औरंगजेबचा सोमनाथ मंदिराचे मस्जिद करण्याचा होता प्रयत्न'

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सोमनाथ मंदिराच्या 100 व्या वर्षानिमित्त स्वाभिमान पर्व आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) हे देखील सहभागी झाले. यावेळी पंतप्रधानांनी सोमनाथ मंदिर परिसरातून राष्ट्राला संबोधित केले. यावेळी गुजरातमधील (GUJARAT) सोमनाथ मंदिरात मोठा उत्साह दिसून आला.**

पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात "जय सोमनाथ" च्या जयघोषाने केली, पुढे पंतप्रधानांनी सांगितले की सोमनाथ स्वाभिमान पर्व हे भारतातील लाखो नागरिकांच्या शाश्वत श्रद्धा, भक्ती आणि अढळ संकल्पाचे जिवंत प्रतीक आहे. हा उत्सव केवळ एक कार्यक्रम नाही तर भारताच्या शाश्वत चेतनेचे, सांस्कृतिक वारशाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. औरंगजेबाने सोमनाथ मंदिराचे मशिदीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला होता, असा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला आहे. याची चर्चा सुरु झाली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सकाळी गिर सोमनाथ येथे आयोजित शौर्य यात्रेत सहभागी झाले आणि त्यानंतर सोमनाथ मंदिरात त्यांनी प्रार्थना



केली. शौर्य यात्रेदरम्यान, पंतप्रधान मोदी भगवान शिवाचे वाद्य डमरू हातामध्ये घेतले होते. यावेळी सोमनाथ मंदिराचे महत्त्व स्पष्ट करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, हे मंदिर शाश्वत देवत्वाचे प्रतीक आहे, जे पिढ्यानपिढ्या लोकांना मार्गदर्शन करत आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर (ट्विटर) असेही लिहिले: "सोमनाथ शाश्वत देवत्वाचे प्रतीक आहे आणि त्याची पवित्र उपस्थिती पिढ्यानपिढ्या लोकांना मार्गदर्शन करत आहे."पुढे पंतप्रधान मोदी म्हणाले की, "सोमनाथ हे केवळ तीर्थक्षेत्र नाही, तर ते भारताचे सांस्कृतिक आत्मा आहे.

पवित्र श्री सोमनाथ मंदिरातील या भव्य उत्सवात सहभागी होणे हा त्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय आणि अमूल्य क्षण आहे असे पंतप्रधान मोदींनी भावनिकपणे व्यक्त केले. ते म्हणाले की, या उत्सवाचे वातावरण, भव्यता आणि दिव्यता हृदयाला खोलवर स्पर्श करते. ते म्हणाले, "हे वातावरण, हा उत्सव अद्भुत आहे. हा एक दिव्य आणि भव्य प्रसंग आहे. या कार्यक्रमात अभिमान, प्रतिष्ठा आणि सन्मान आहे."सोमनाथ स्वाभिमान पर्वाला उपस्थित राहणे हे त्यांच्यासाठी एक भाग्य आहे असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

### सोमनाथची पुनर्स्थापना झाली

"सोमनाथ हे केवळ एक तीर्थक्षेत्र नाही तर ते भारताच्या सांस्कृतिक आत्म्याचे, त्याच्या अखंडतेचे आणि त्याच्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे, ज्याने प्रत्येक आव्हानाला न जुमानता त्याचे अस्तित्व आणि वैभव टिकवून ठेवले आहे."पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "सोमनाथचा इतिहास विनाश आणि पराभवाचा नाही; तो विजय आणि पुनर्बांधणीचा आहे.

# मराठी चित्रपटांचे बजेट कमी, मग तिकिटांचे दर कमी का नाही?

अभिनेता गश्मीर महाजनी हा त्याच्या अभिनयामुळे ओळखला जातो. त्याचा चाहतावर्ग मोठा आहे. गेल्या काही दिवसांत तो पडद्यावर दिसला नसला तरी तो सोशल मीडियाच्या माध्यमातून कायमच प्रेक्षकांच्या संपर्कात असतो. गश्मीर सोशल मीडियावर अनेकदा चाहत्यांशी थेट संवाद साधतो. आस्क गश या सेशनमध्ये तो चाहत्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देतो. चाहते अनेकदा त्याला तो पुन्हा अभिनयाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला कधी येणार आहे, असे प्रश्न विचारतात.कधी त्याला त्याच्या खासगी आयुष्याबद्दलही प्रश्न विचारतात. काही जण त्याच्यावर प्रेम असल्याचे सांगतात; तर काही जण त्याला त्यांच्या आयुष्यातील अडचणींवर मात करण्यासाठी मार्ग विचारतात. गश्मीरदेखील या सर्व प्रश्नांची कधी गमतीने, कधी गंभीरतेने, संयमाने उत्तरे देत असल्याचे दिसते.आता नुकताच ‘आस्क गश’ या सेशनमध्ये एका चाहत्याने त्याला विचारले की, गश्मीर जर मराठी चित्रपटांचे बजेट कमी आहे, तर मग



तिकिटांचे दर कमी का नाहीत? त्यावर गश्मीर म्हणाला, “तिकिटांचे दर वाढविण्यापेक्षा आपण चित्रपट निर्मितीचा दर्जा वाढवण्याबद्दल विचार केला पाहिजे. आधी चांगले चित्रपट बनवले पाहिजेत आणि त्यानंतर पैशाबद्दल विचार केला पाहिजे; हे साधं गणित आहे.”त्याबरोबरच एकाने विचारले की, तुझा आगामी प्रोजेक्ट कधी येणार? त्यावर अभिनेता गश्मीर म्हणाला, “फेब्रुवारीमध्ये शूटिंग करणार आहे. २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे”, आणखी एकाने विचारले की कोणत्या दिग्दर्शकाबरोबर काम करायचे आहे? त्यावर गश्मीरने श्रीराम राघवन यांचे नाव घेतले. एकाने विचारले की, तुझ्या कोणत्या चित्रपटाचा तुला सीक्वेल काढायला आवडेल? त्यावर अभिनेत्याने कोणत्याच नाही, असे उत्तर दिले. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे गश्मीरने दिली आहेत.गश्मीरने याआधीही अनेकदा तो २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले आहे. गश्मीर अभिनयाबरोबरच त्याच्या नृत्यासाठीदेखील ओळखला जातो. आता गश्मीर महाजनीचा हा प्रोजेक्ट नेमका काय असणार आहे.

## तर माझं मेलेलं तोंड बघाल

बॉलीवूडमधील सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक म्हणून जंजीर या सिनेमाला गणले जाते. अमिताभ बच्चन यांनी प्रमुख भूमिका साकारलेला हा सिनेमा चांगलाच गाजला होता. अमिताभ बच्चन यांची चित्रपटातील अँग्री यंग मॅन भूमिका प्रेक्षकांना आवडली होती. जंजीर चित्रपटाची पटकथा सलीम खान व जावेद अख्तर यांनी लिहिली होती, तर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन प्रकाश मेहरा यांनी केली होती. मात्र, अमिताभ बच्चन हे या चित्रपटासाठी पहिली निवड नव्हते. धर्मेंद्र यांना या चित्रपटासाठी विचारले होते. मात्र, त्यांनी या चित्रपटाला नकार दिला. त्यानंतर अमिताभ बच्चन यांनी जंजीर या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली, असे वक्तव्य जावेद अख्तर यांनी केले होते. आता बॉबी देओलने त्याच्या वडिलांनी म्हणजेच दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांनी या ब्लॉकबस्टर चित्रपटाला का नकार दिला याचे भावनिक कारण सांगितले आहे.बॉबी देओलने नुकताच इन्स्टंट बॉलीवूडशी संवाद साधला. यावेळी त्याला विचारण्यात आले की, त्याने किंवा त्याच्या कुटुंबातील इतर कोणी कोणाला मदत करण्यासाठी एखादा चित्रपट केला आहे का? यावर बोलताना बॉबी देओल म्हणाला, “माझ्या मावशीचे पती हे आर्थिक अडचणीत होते, त्यांच्यासाठी त्यांनी सत्यकाम हा चित्रपट केला

## अथियाने शेअर केला मुलीचा फोटो



अभिनेत्री अथिया शेट्टी व केएल राहुल नुकतेच आई-बाबा झाले. अथियाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. अथिया व केएल राहुलची लाडकी लेक तीन आठवड्यांची झाली आहे. त्यांनी आता त्यांच्या मुलीचं नाव जाहीर केलं आहे. इतकंच नाही तर या जोडप्याने लेकीबरोबरचा एक सुंदर फोटोही पोस्ट केला आहे. अथिया शेट्टीने २४ मार्च रोजी मुलीला जन्म दिला. अथिया व केएल राहुल यांचं हे पहिलंच बाळ आहे. बाबा झाल्यावर केएल राहुल आयपीएलचा सामना सोडून मुंबईत आला होता. अथियाने आता इन्स्टाग्रामवर एक फॅमिली फोटो पोस्ट केला आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये त्यांनी मुलीचं नाव सांगितलं आहे.फोटोमध्ये केएल राहुलने लाडक्या लेकीला जवळ घेतलंय आणि अथिया तिच्याकडे प्रेमाने बघतेय. “आमची लाडकी लेक, आमचं सर्वस्व.अथिया शेट्टीच्या या पोस्टवर चाहत्यांनी तसेच कलाकारांनी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनुष्का शर्मा, मलायका अरोरा, समांथा रूथ प्रभू यांनी या पोस्टवर रेड हार्ट इमोजी कमेंट केले आहेत. अनेकांना अथिया व केएल राहुल यांनी त्यांच्या मुलीसाठी जे नाव निवडलं ते आवडलं असून कौतुक केलं आहे.अथिया शेट्टी व केएल राहुल यांनी काही वर्षे एकमेकांना डेट केल्यावर दोन वर्षांपूर्वी २३ जानेवारी २०२३ रोजी लग्नगाठ बांधली. या दोघांचे लग्न सुनील शेट्टीच्या खंडाळा येथील फार्म हाऊसवर पार पडलं होतं. या लग्नाला फक्त दोघांचे कुटुंबीय आणि क्रिकेटविश्वातील व सिनेइंडस्ट्रीतील काही मोजकेच लोक उपस्थित राहिले होते.

## एकट्यात माझ्याशी फ्लर्ट करते आणि....

‘बिग बॉस १९’च्या खेळाला आता जवळपास ७० दिवस झाले आहेत. हळूहळू हा शो आता अंतिम टप्प्याकडे जात आहे. शोमधील काही स्पर्धकांचा प्रवास संपला आहे; तर उर्वरित सदस्यांपैकीही एकेक जण आता घरातून बाहेर पडणार आहे. ‘बिग बॉस’च्या घरातील सर्वांनाच आता एकमेकांचे स्वभाव माहीत झाले आहेत. बिग बॉसच्या घरात स्पर्धकांचं एकमेकांबरोबर नातं तयार होतं; पण ही नाती काही शेवटपर्यंत टिकत नाहीत. ‘बिग बॉस १९’ सुरू होताच सुरुवातीला काही नाती तयार झाली. मात्र, आता त्या प्रत्येक नात्यात दुरावा येत आहे आणि या दुराव्याचं कारण म्हणजे भांडण. ‘बिग बॉस’च्या घरात तान्या आणि शेहबाज हे दोघे एकमेकांचे चांगले मित्र होते. दोघे एकमेकांना भाऊ-बहीणही मानतात. मात्र, आता या भाऊ-बहिणीच्या नात्यात दुरावा येणार आहे. दोघांमध्ये आजच्या भागात भांडण होणार आहे‘बिग बॉस १९’च्या आजच्या भागाचा प्रोमो नुकताच समोर आला आहे आणि या प्रोमोत शेहबाजनं त्याची लाडकी बहीण तान्याची सर्वांसमोर पोलखोल केली आहे. या प्रोमोमध्ये शेहबाज घरातील स्पर्धकांना म्हणतो, “मी आता हिचा खरा चेहरा सर्वांसमोर आणणार आहे. कोणत्याही छोट्या गोष्टीवर रडत बसते आणि हे सगळं फक्त लोकांना दाखवण्यासाठी ती करते. मी किती शांत आहे, सभ्य आहे आणि मी किती सुशील आहे हे दाखवण्यासाठी सगळा ड्रामा करते.”शेहबाज व तान्याच्या या भांडणामध्ये अभिषेक बजाजही तिच्याबद्दल प्रतिक्रिया देतो आणि म्हणतो, “तान्या, माझ्याशी एकट्यात फ्लर्ट करते. मी भाव देत नाही, तर ती म्हणते की, एकट्यात का भेटत नाहीस.” हे ऐकून सर्वांनाच धक्का बसतो. त्याचे हे आरोप ऐकून तान्यालाही राग अनावर होतो. ती अभिषेकजवळ जात त्याला, “उगाच खोटे आरोप करू नकोस. मला तुझ्याशी फ्लर्ट करायची काहीच गरज नाही. स्वत:चं तोंड बघ. तू माझ्या टाईपचा नाहीस” असं ठणकावून म्हणते. ‘बिग बॉस १९’च्या खेळाला आता जवळपास ७० दिवस झाले आहेत. हळूहळू हा शो आता अंतिम टप्प्याकडे जात आहे. शोमधील काही स्पर्धकांचा प्रवास संपला आहे.



## नुपूर-स्टेबिन अडकले विवाहबंधनात!

बॉलिवूड अभिनेत्री कृती सेननची बहीण नुपूर सेनन हिने ११ जानेवारी रोजी उदयपूर येथे गायक स्टेबिन बेनशी लग्न केले. या जोडप्याने प्रथम ख्रिश्चन पद्धतीने लग्न केले आणि नंतर हिंदू पद्धतीने देखील त्यांचा विवाह सोहळा पार पडला. या सोहळ्याला कुटुंब आणि जवळचे मित्र उपस्थित होते. या जोडप्याने काल सोशल मीडियावर त्यांच्या ख्रिश्चन लग्नाचे फोटो शेअर केले होते. हे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते.११ जानेवारी रोजी नुपूर सेनन आणि स्टेबिन बेन यांनी दिवसा ख्रिश्चन पद्धतीने लग्न केले. त्याच रात्री त्यांनी हिंदू रितीरिवाजांनुसार सात फेरे घेतले आणि आयुष्यभरासाठी एकमेकांचे झाले. लोक त्यांच्या लग्नाच्या फोटोंची आतुरतेने वाट पाहत होते. आता, या जोडप्याने त्यांच्या लग्नाचे खास फोटो शेअर केले आहेत. दुसऱ्या फोटोमध्ये, स्टेबिन बेन त्यांची वधू नुपूर सेननचा हात धरून सात फेरे घेत आहे.त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत. अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी कमेंट सेक्शनमध्ये फोटोंवर प्रेमाचा वर्षाव केला आहे. सर्वांनी या जोडप्याचे अभिनंदन करण्यास सुरुवात केली आहे.या लग्नाच्या फोटोंमध्ये नुपूर आणि स्टेबिनचे संपूर्ण कुटुंब त्यांना आशीर्वाद देत असल्याचे दिसून आले आहे.

स्ट्राईक रेटशी करतोय संघर्ष

मेलबर्न रेनेगेड्सने क्रीजवरून बोलावले परत

# रिझवानने पाकिस्तानचं नाक कापलं!

## हरिस रौफ देखील महागडा



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोहम्मद रिझवान सध्या बिग बॅश लीग २०२५-२६ मध्ये मेलबर्न रेनेगेड्सकडून खेळत आहे. सोमवारी, सिडनी थंडरविरुद्धच्या सामन्यात, रिझवानला चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी मैदानात आला. रिझवानला क्रीजवरील गोलंदाजांविरुद्ध संघर्ष करताना दिसून आला. त्याने २३ चेंडूंमध्ये २६ धावांच केल्या. या खेळीत त्याने दोन चौकार आणि एक षटकार मारला, तर त्याचा स्ट्राइक रेट फक्त ११३.०४ होता, जो संघाला अपेक्षा होती असा नव्हता.**

तेच्या या खेळीमुळे संघाच्या कर्णधाराने त्याला निवृत्त होण्याचे संकेत दिले. कर्णधाराकडून सिग्नल मिळाल्यानंतर, रिझवान अनिच्छेने डोके टेकवून पॅव्हेलियनमध्ये माघारी परतला. मेलबर्न रेनेगेड्सला २० षटकांत ८ गडी गमावून १७० धावाच करता आल्या. मोहम्मद रिझवान हा सध्याच्या काळातील पाकिस्तानच्या आघाडीच्या क्रिकेटपटूंपैकी एक क्रिकेटपटू आहे. रिझवान बऱ्याच काळापासून टी२० मध्ये त्याच्या स्ट्राईक रेटशी संघर्ष करताना दिसत आहे. यामुळे पाकिस्तानच्या टी२० संघात त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.तसेच, २०२६ च्या टी२० विश्वचषकात स्थान मिळवण्याची त्याची शक्यता देखील कमी असल्याची मानली जात आहे. टी२० विश्वचषकासाठी रिझवानला प्राथमिक संघात स्थान देण्यात आलेले नाही.हंगाम सुरू होण्यापूर्वीच, बीबीएलमध्ये पाकिस्तानी क्रिकेटपटूंना बरीच प्रसिद्धी मिळाली. बाबर आझम, रिझवान, शाहीन शाह आफ्रिदी, हरिस रौफ आणि शादाब खान यांच्याकडून अपेक्षा जास्त व्यक्त करण्यात आल्या होत्या. मात्र या स्पर्धेत आतापर्यंतची त्यांची कामगिरी निराशाजनक अशीच राहिली आहे. शाहीन आफ्रिदी दुखापतीमुळे मायदेशी परतला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी शादाब खानला परत बोलावण्यात आले आहे आणि हरिस रौफ अजून देखील महागडा ठरत असल्याचे चित्र आहे.बाबर आझम सिडनी सिक्सर्सकडून खेळत असून तो डावाची सुरुवात करत आहे, परंतु त्याची कामगिरी त्याला साजेशी राहिलेली नाही. बाबरने या हंगामात आठ सामन्यांमध्ये आठ डावांमध्ये केवळ १५४ धावाच केल्या आहेत, यामध्ये त्याने १०४.०५ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. रिझवानची सरासरी बाबरपेक्षा देखील कमी आहे. रिझवानने आठ डावांमध्ये २०.८७ च्या सरासरीने आणि १०१.८२ च्या स्ट्राईक रेटने १६७ धावा केल्या आहेत.मोहम्मद रिझवान सध्या बिग बॅश लीग २०२५-२६ मध्ये मेलबर्न रेनेगेड्सकडून खेळत आहे. सोमवारी, सिडनी थंडरविरुद्धच्या सामन्यात, रिझवानला चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी मैदानात आला. रिझवानला क्रीजवरील गोलंदाजांविरुद्ध संघर्ष करताना दिसून आला. त्याने २३ चेंडूंमध्ये २६ धावांच केल्या. या खेळीत त्याने दोन चौकार आणि एक षटकार मारला, तर त्याचा स्ट्राइक रेट फक्त ११३.०४ होता, जो संघाला अपेक्षा होती असा नव्हता.

तेच्या या खेळीमुळे संघाच्या कर्णधाराने त्याला निवृत्त होण्याचे संकेत दिले. कर्णधाराकडून सिग्नल मिळाल्यानंतर, रिझवान अनिच्छेने डोके टेकवून पॅव्हेलियनमध्ये माघारी परतला. मेलबर्न रेनेगेड्सला २० षटकांत ८ गडी गमावून १७० धावाच करता आल्या. मोहम्मद रिझवान हा सध्याच्या काळातील पाकिस्तानच्या आघाडीच्या क्रिकेटपटूंपैकी एक क्रिकेटपटू आहे. रिझवान बऱ्याच काळापासून टी२० मध्ये त्याच्या स्ट्राईक रेटशी संघर्ष करताना दिसत आहे. यामुळे पाकिस्तानच्या टी२० संघात त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.तसेच, २०२६ च्या टी२० विश्वचषकात स्थान मिळवण्याची त्याची शक्यता देखील कमी असल्याची मानली जात आहे. टी२० विश्वचषकासाठी रिझवानला प्राथमिक संघात स्थान देण्यात आलेले नाही.हंगाम सुरू होण्यापूर्वीच, बीबीएलमध्ये पाकिस्तानी क्रिकेटपटूंना बरीच प्रसिद्धी मिळाली. बाबर आझम, रिझवान, शाहीन शाह आफ्रिदी, हरिस रौफ आणि शादाब खान यांच्याकडून अपेक्षा जास्त व्यक्त करण्यात आल्या होत्या.

### क्रिकेटपटूंना मिळाली प्रसिद्धी

मात्र या स्पर्धेत आतापर्यंतची त्यांची कामगिरी निराशाजनक अशीच राहिली आहे. शाहीन आफ्रिदी दुखापतीमुळे मायदेशी परतला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी शादाब खानला परत बोलावण्यात आले आहे आणि हरिस रौफ अजून देखील महागडा ठरत असल्याचे चित्र आहे.बाबर आझम सिडनी सिक्सर्सकडून खेळत असून तो डावाची सुरुवात करत आहे, परंतु त्याची कामगिरी त्याला साजेशी राहिलेली नाही.बाबरने या हंगामात आठ सामन्यांमध्ये आठ डावांमध्ये केवळ १५४ धावाच केल्या आहेत.

# कोणी केली 'गब्बर' ची शिकार?

## शिखर धवन पुन्हा चढणार बोहल्यावर! वाचा संपूर्ण प्रेमकहाणी



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'गब्बर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताचा माजी सलामीवीर शिखर धवनने १२ जानेवारी रोजी त्याची प्रेयसी सोफी शाइनशी साखरपुड्याची घोषणा केली आहे. धवनने सोमवारी त्याच्या सोशल मीडिया हँडलद्वारे चाहत्यांना ही आनंदाची माहिती दिली. मागील वर्षी १ मे रोजी या दोघांनी त्यांच्या नात्याची अधिकृत माहिती दिली होती. त्यानंतर शिखर आणि सोफी काही काळापासून डेटिंग करत आहेत.**

शिखर धवनने त्याच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये एक फोटो शेअर केला असून त्यामध्ये सोफीचा धवनच्या हाताशी असलेला हात दिसून येत आहे. फोटोमध्ये शाइनच्या बोटावर लग्नाची अंगठी देखील दिसत आहे. यावेळी धवनने फोटोच्या कॅप्शनमध्ये लिहिले की, "स्मितहास्य वाटण्यापासून ते स्वप्ने वाटण्यापर्यंत. आम्ही कायमचे एकत्र राहण्याचा निर्णय घेत असताना आमच्या लग्नासाठी सर्व प्रेम, आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्याबद्दल आभारी आहे." त्यांच्या साखरपुड्याचा हा फोटो सोशल मीडियावर लवकरच व्हायरल होत आहे. तसेच, गब्बरच्या फोटोवर चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.शिखर धवन आणि सोफी शाइन हे दोघे पहिल्यांदा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ दरम्यान एकत्र दिसुन आले होते. त्यानंतर हे जोडपे चर्चेचा विषय बनत गेले. त्यानंतर काही वेळातच धवनने त्यांच्या नात्याला दुजोरा दिला. तसेच सोफी आणि धवन सोशल मीडिया पोस्टवर वारंवार एकत्र दिसून आले. सोफी लिमरिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून मार्केटिंग आणि मॅनेजमेंट पदवी घेतली आहे. ती सध्या अबू धाबीमधील नॉर्दर्न ट्रस्ट कॉर्पोरेशनची दुसरी उपाध्यक्ष आहे.

### धवनचा झाला होता घटस्फोट

घेतला होता. या काळात धवनकडुन आरोप करण्यात आला होता की, आयेशाने त्याचा "मानसिक छळ" केला आहे. धवनपेक्षा १० वर्षांनी मोठी असलेली आयेशा ही एक किकबॉक्सर आहे जिने २०१२ मध्ये भारतीय क्रिकेटपटूशी लग्न केले होते. २०२१ मध्ये, आयेशाने सोशल मीडियावर धवनपासून वेगळे होत असल्याची घोषणा केली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

ePaper

। मंगळवार ।
दि. 13 जानेवारी 2026

## नव्या राजकारणाची नवी दिशा

# गाठी-भेटींमधून विश्वास निर्माण करणाऱ्या आशाताई भोंडवे!

## मिशन- PCMC : "लोकांच्या दारात जाऊन समस्या ऐकणारी, उपाय मांडणारा उमेदवार





। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : राजकारण म्हणजे केवळ घोषणा, सभा आणि आश्वासनांचा खेळ—ही पारंपरिक धारणा मोडीत काढत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक 2026 च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 16 मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार आशाताई भोंडवे यांनी जनतेशी थेट संवादाचा वेगळा मार्ग स्वीकारला आहे. मामुर्डी, किवळे, रावेत आणि गुरुद्वार परिसरात त्या मोठ्या सभांऐवजी गाठी-भेटी, होम मीटिंग्स आणि कोपरा संवादांवर भर देताना दिसत आहेत.**




> "मी सत्तेच्या मोहासाठी नाही, तर सेवेच्या संधीसाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. लोकांचे प्रश्न ऐकणे, त्यावर ठोस उपाय देणे आणि बदल घडवणे—हेच माझे राजकारण आहे."
>
> **—आशा भोंडवे,** उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस, प्रभाग क्रमांक 16

प्रत्येक गल्ली, वस्ती आणि सोसायटीत जाऊन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, त्यांच्या अडचणी ऐकून घेणे आणि त्यावर ठोस उपाय सुचवणे—ही आशाताईंची प्रचारशैली सध्या प्रभागात चर्चेचा विषय ठरत आहे. पाणीपुरवठा, रस्त्यांची अवस्था, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सुरक्षितता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी नागरिकांकडून थेट माहिती घेतली असून, त्या समस्यांवर आधारित प्रभागस्तरीय सूक्ष्म जाहीरनामा (MICRO-MANIFESTO) सादर केला आहे.

"निवडणूक म्हणजे मत मागण्यापुरती प्रक्रिया नाही, तर जबाबदारी स्वीकारण्याची सुरुवात आहे," ही त्यांची भूमिका प्रत्येक भेटीतून अधोरेखित होत आहे. विकासनगर, रावेत आणि किवळे भागात झालेल्या गाठी-भेटींमध्ये ज्येष्ठ नागरिकांनी प्रलंबित प्रश्न मांडले, महिलांनी सुरक्षेच्या चिंता व्यक्त केल्या, तर तरुणांनी रोजगार आणि सुविधा याबाबत अपेक्षा ठेवल्या. या सर्व मुद्द्यांची नोंद घेत आशाताईंनी केवळ आश्वासन न देता लेखी उपाययोजना मांडण्याचा शब्द दिला आहे. त्यामुळे त्या हळूहळू "आपली माणूस" अशी ओळख निर्माण करत आहेत. गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत प्रश्नांवर कृतीशील आराखडा मांडत आशाताईंनी विकासाचे स्पष्ट चित्र समोर ठेवले आहे. "प्रश्न समजून घेणे आणि त्यावर प्रत्यक्ष उपाय करणे" ही त्यांची कार्यपद्धती केवळ घोषणांपुरती न राहता कृतीत उतरवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

## मिशन: PCMC - दिघी बोपखेल येथील

# संकल्प मेळाव्यात विजयाचा एल्गार!

### उमेदवारांचा व्यापक घरोघरी प्रचार, भाजप उमेदवारांना मोठ्या प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ दिघी बोपखेल येथे भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचा व्यापक घरोघरी प्रचार व विजयी संकल्प मेळावा उत्साहात पार पडला.**





सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या प्रचार मोहिमेत सुमारे २५० कार्यकर्ते, पदाधिकारी व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार श्रुती विकास डोळस, कृष्णा भिकाजी सुरकुले, हिरानानी गोवर्धन घुले आणि उदय दत्तात्रय गायकवाड यांनी कार्यकर्त्यांसह राजनंदिनी, गोल्ड क्लिप, आनंद आश्रय, तनिष आयकॉन सोसायटी तसेच समर्थ नगर व परिसरात घरोघरी जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला.

या वेळी नागरिकांच्या समस्या जाणून घेत प्रभागातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, सुरक्षा आणि सामाजिक विकास यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. निवडून आल्यानंतर प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा विश्वास उमेदवारांनी मतदारांना दिला. नागरिकांकडून उमेदवारांना उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसून आला.

प्रचारादरम्यान भारतीय जनता पक्षाच्या धोरणांची तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती मतदारांना देण्यात आली. सायंकाळी सात वाजता राघव मंगल कार्यालय येथे विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास प्रभागातील कार्यकर्ते, भारतीय जनता पक्षाचे आजी व माजी पदाधिकारी, विविध सहकारी संघटनांचे प्रतिनिधी तसेच मित्रपक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विजयी संकल्प मेळाव्यातून आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना नवी दिशा व बळ मिळाले असून प्रभाग क्रमांक ४ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना मोठे पाठबळ मिळत असल्याचे चित्र आहे. या प्रचार मोहिमेमुळे भाजपचा विजय निश्चित असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.न

## प्रचार समाप्तीनंतर सर्व प्रसारमाध्यमांतील निवडणूकविषयक जाहिरातींना बंदी

### राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देश; निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांची माहिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जाहीर प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपणार आहे. त्यानंतर इलेक्ट्रॉनिक, मुद्रित तसेच अन्य कोणत्याही प्रकारच्या प्रसारमाध्यमांतून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.**




राज्य निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार मतदान समाप्तीच्या ४८ तास आधी जाहीर प्रचार थांबवणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने प्रचार समाप्तीची वेळ निश्चित करण्यात आली असून, या कालावधीनंतर कोणत्याही स्वरूपाचा प्रचार, प्रसिद्धी अथवा जाहिरात करणे हा निवडणूक आचारसंहितेचा भंग मानला जाणार आहे. याबाबत सविस्तर माहिती देताना प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या अध्यक्षा तथा महापालिका अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ही वेळ प्रचार समाप्तीसाठी निश्चित केली आहे. या वेळेनंतर कोणत्याही उमेदवार, राजकीय पक्ष किंवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वृत्तपत्रे, सोशल मीडिया, वेबसाईट्स, केबल टीव्ही, एफएम रेडिओ किंवा इतर कोणत्याही डिजिटल माध्यमातून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत.

प्रचार समाप्तीनंतर प्रसारमाध्यमांतील जाहिरातींच्या पूर्वप्रमाणनाबाबतही कोणतीही परवानगी दिली जाणार नाही, अशी माहिती समितीचे सदस्य सचिव किरण गायकवाड यांनी दिली. ते म्हणाले की, जाहीर प्रचार संपल्यानंतर जाहिरातींच्या प्रमाणनाचा प्रश्नच उद्भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर तरतुदी राज्य निवडणूक आयोगाने ९ ऑक्टोबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५' मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत.

या आदेशानुसार सर्व उमेदवार, राजकीय पक्ष तसेच प्रसारमाध्यमांनी अत्यंत काटेकोरपणे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि शांततेत पार पडावी यासाठी आयोगाने हे निर्बंध घातले असून, सर्व संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्रचार समाप्तीनंतर मतदारांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे, असेही प्रशासनाने सूचित केले आहे.

## स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य

# देशाच्या इतिहासातील एक अभिनव व पहिलाच प्रयोग!

## अभिनव प्रयोग; “विकसित भारतासाठी विकसित पिढी”चे ध्येय

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधत १२ जानेवारी रोजी “विकसित भारतासाठी विकसित पिढी” हे ध्येय मनाशी बाळगून बापू एमसीसी, पुणे व सुराज्य शैक्षणिक संकुल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत कार्यशाळा या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



### आरोग्य विमा योजना

या कार्यशाळेत तिसरी ते बारावीतील विद्यार्थ्यांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत म्हणजेच पुढील २१ वर्षांचा स्वतःच्या आयुष्याचा नियोजनबद्ध विकास आराखडा तयार केला. विद्यार्थ्यांनी “माझा प्रवास” या नावाची स्वतंत्र फाईल तयार करून मी आतापर्यंत काय शिकलो, कोणती कौशल्ये आत्मसात केली, पुढे कोणती कला, ज्ञान व कौशल्ये शिकायची, ती कुठून व कधी शिकायची याचे सविस्तर लिखित नियोजन केले.

केवळ विचारांपुरते न राहता, पुढील २१ वर्षांचा विकास आराखडा प्रत्यक्ष लिखित स्वरूपात स्वतःजवळ ठेवण्याचा हा उपक्रम देशाच्या इतिहासातील एक अभिनव व पहिलाच प्रयोग ठरणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

या माध्यमातून स्वतःला विकसित करून राष्ट्राला विकसित करण्यासाठी मी आजपासून कोणती ठोस कृती करणार यावर आधारित कृतीयुक्त शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले.

ही कार्यशाळा भोसरी येथील सुराज्य शैक्षणिक संकुलातील विकसित भारत कार्यशाळा केंद्रामध्ये यशस्वीपणे संपन्न झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी अशा प्रकारच्या उपक्रमांची आजच्या काळात अत्यंत गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

### युवा पिढी निर्णायक भूमिकेत

या उपक्रमाचे संकल्पक, सुराज्य शैक्षणिक संकुल, पुणे चे अध्यक्ष व समाजप्रबोधनकार पृथ्वीराज प्रकाश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “आजची पहिली ते बारावीची पिढी जर सक्षम, विचारशील आणि कौशल्यसंपन्न घडली, तर पुढील २०–२१ वर्षांनंतर हीच पिढी देशाचा सर्वात मोठा कार्यशील आधार ठरेल आणि विकसित भारत घडविण्यात निर्णायक भूमिका बजावेल.”

# मातंग समाज संघटनेचा भाजपाला बिनशर्त जाहीर पाठिंबा

## मिशन-PCMC : पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना दिले पत्र

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य मातंग समाज संघटनेच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला (भाजप) बिनशर्त जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. याबाबत संघटनेचे शहर व जिल्हाध्यक्ष बाळासाहेब खंदारे यांनी भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांना अधिकृत पत्राद्वारे पाठिंबा दिला आहे. यावेळी संघटनेचे बालाजी कांबळे, गिरीश सोनवणे, भिमराव बरगडे उपस्थित होते.**



पत्रात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून राज्यात आणि केंद्रात कार्यरत असलेल्या सरकारने मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. समाजाच्या उन्नतीसाठी राबविण्यात आलेल्या विविध योजना, विकासकामे व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने घेतलेले निर्णय हे कौतुकास्पद असल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. मातंग समाजाच्या राष्ट्रीय नेतृत्वाखाली तसेच मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपभाऊ कांबळे, आमदार अमित गोरखे आणि आमदार उमाताई खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे.

## महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा निवडणुकी संदर्भात

# सर्वोच्च न्यायालयाचा महत्वाचा आदेश!

## 15 फेब्रुवारी 2026 पर्यंत जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्याचे आदेश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरु असताना राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हा परिषदा निवडणुका घेण्यासाठी 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. 15 फेब्रुवारी 2026 पर्यंत जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने 31 जानेवारी 2026 पर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले होते.**



याआधी सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील आरक्षणाच्या अडचणी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयात अर्ज दाखल करून मुदतवाढीची मागणी केली होती.

राज्य निवडणूक आयोगाने आपल्या अर्जात स्पष्ट केले होते की, राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे गेलेली नाही. त्यामुळे या ठिकाणी निवडणुका घेण्यासाठी किमान १० दिवसांची अतिरिक्त मुदत देण्यात यावी, अशी विनंती आयोगाकडून करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी मान्य करत केवळ १० नव्हे, तर एकूण १५ दिवसांची मुदतवाढ मंजूर केली आहे.

या निर्णयानुसार, ज्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडलेली नाही, त्या ठिकाणच्या निवडणुका आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करता येणार आहेत.

निवडणूक आयोगासाठी हा मोठा दिलासा मानला जात असून, नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुका पार पाडण्यास यामुळे मदत होणार आहे.

मात्र, हा दिलासा सर्व जिल्हा परिषदांसाठी नसून, केवळ १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांपुरताच मर्यादित आहे. ज्या ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपुढे गेली आहे, त्या जिल्हा परिषदांबाबत पुढील सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. त्या सुनावणीत उर्वरित जिल्हा परिषद निवडणुकांबाबत निर्णय अपेक्षित आहे.

दरम्यान, राज्यात सध्या महापालिका निवडणुकांची जोरदार तयारी सुरू आहे. महापालिकेच्या निवडणुका १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, १६ जानेवारीला मतमोजणी पार पडणार आहे. मुंबईसह राज्यातील तब्बल २९ महानगरपालिकांसाठी निवडणुका होत आहेत. त्यामुळे प्रशासन, निवडणूक आयोग तसेच राजकीय पक्षांमध्ये प्रचंड हालचाली सुरू आहेत.

महापालिकेच्या आधी नगरपरिषदांच्या निवडणुका पार पडल्या असून, त्यामध्ये महायुतीतील तिन्ही पक्षांनी घवघवीत यश मिळवले आहे. या निवडणुकांमध्ये भाजप सर्वाधिक यशस्वी ठरला, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर राहिली. अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

एकूणच, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्य निवडणूक आयोगाला मोठा दिलासा मिळाला असून, एकाच वेळी अनेक निवडणुका घेण्याचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

आगामी काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांबाबत राजकीय हालचालींनाही वेग येण्याची शक्यता आहे.

# पिंपरी चिंचवडच्या विकासाचे शिल्पकार अजितदादा – आमदार रोहित पवार

## राष्ट्रवादीच्या प्रभाग 16 मधील रॅली पाहून रोहित पवारांचा विजयाचा आत्मविश्वास

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पिंपरी-चिंचवड शहराचा विकास हा कोणताही योगायोग नसून दूरदृष्टी, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि ठोस नेतृत्वाचा परिणाम आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली शहरातील पायाभूत सुविधा सक्षम झाल्या असून, शरद पवार केंद्रात असताना मिळालेल्या भरघोस निधीमुळेच शहराचा चेहरामोहरा बदलला, असे ठाम प्रतिपादन आमदार रोहित पवार यांनी केले.**




राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रभाग क्रमांक १६ मधील उमेदवारांच्या समर्थनार्थ काढण्यात आलेल्या भव्य रॅलीच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रभाग १६ चे पॅनेल प्रमुख व सर्वसाधारण गट 'ड'चे उमेदवार माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, नागरिकांचा मागास प्रवर्ग 'ब' गटाच्या उमेदवार जयश्री भोंडवे, सर्वसाधारण महिला 'क' गटाच्या आशा भोंडवे आणि अनुसूचित जाती 'अ' गटाच्या श्रेया तरस-गायकवाड यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.

रॅलीला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून रोहित पवार म्हणाले, "एवढ्या मोठ्या जनसमर्थनानंतर विजयाचा गुलाल आजच उधळायला हरकत नाही." त्यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये उत्साहाची लाट उसळली.

ढोल-ताशे, घोषणाबाजी आणि महिलांचा मोठा सहभाग यामुळे संपूर्ण रॅलीत परिवर्तनाची चाहूल जाणवत होती. ठिकठिकाणी उमेदवारांचे नागरिकांकडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

नागरी प्रश्नांवर थेट भाष्य करताना रोहित पवार म्हणाले की, शहरातील वाहतूक कोंडी गंभीर बनली असून पिण्याच्या पाण्याची टंचाई नागरिकांना भेडसावत आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ उमेदवारांची नसून, ही नागरिकांनी स्वतः हाती घेतलेली लढाई आहे.

युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी सांगितले की, आयटी कंपन्या राज्याबाहेर गेल्याने युवकांच्या नोकऱ्यांवर गंडांतर आले आहे. याच कारणामुळे आयटी क्षेत्रातील तरुण मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले असून, या प्रश्नाला दिशा देण्याची क्षमता फक्त राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर भाजपवर थेट हल्लाबोल करताना त्यांनी रस्त्यांच्या कामातील कथित गैरव्यवहार, कुत्र्यांच्या नसबंदीतील घोटाळे आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून आयात उमेदवारांना तिकीट देण्यावर टीका केली. चिंचवडसह भोसरीचाही समतोल विकास हवा असेल, तर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसलाच संधी द्यावी लागेल, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

यावेळी माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, "मतदार म्हणजेच माझे आई-वडील आहेत. रोहित दादा आणि अजित दादा वेगळे नाहीत. ग्रामीण भागातील मुले आज आयटी क्षेत्रात कार्यरत असून त्यांना आपल्या मूळ पक्षाची ओळख आहे. म्हणूनच ते आज मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले."

या रॅलीतून पिंपरी-चिंचवडमध्ये परिवर्तनाची नांदी झाली असून, विकास, पारदर्शकता आणि युवकांच्या भविष्यासाठी नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी ठाम उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केल्याचे स्पष्ट झाले.

## राजकीय आमिष असतानाही

# सुलक्षणा शिलवंत- धर यांनी स्वाभिमान टिकवला!

### मिशन- PCMC : राष्ट्रवादी श.प. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे गौरोवोद्गार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राजकीय आमिष असतानाही सुलक्षणा शिलवंत-धर यांनी स्वाभिमान टिकवला. विचारांशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी विचार सोडला नाही. आदरणीय शरद पवार साहेबांसोबत ठामपणे उभा राहिल्या. राजकारणातून त्यांना उध्वस्थ करण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांनी माघार घेतली नाही. महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आल्यास त्यांना मोठे पद देण्यात येईल, असा विश्वास राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिला.**




प्रभाग क्रमांक २०, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६च्या पार्श्वभूमीवर ही प्रचारसभा पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत-धर व सौ. नीलम संतोष म्हात्रे यांच्यासाठी सोमवारी (दि. १२ जानेवारी २०२६) सायंकाळी ७ वाजता संत तुकाराम महाराज पुतळा येथे सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी प्रमुख उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार डॉ. अमोल कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित नेत्यांनी मतदारांना 'तुतारी वाजवणारा माणूस' या निवडणूक चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमतांनी उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. मतदान गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे.

#### तुफान प्रतिसाद अन् विजयी रॅली...

प्रभाग क्रमांक २० मध्ये काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीला नागरिकांचा तुफान प्रतिसाद लाभल्याने ही रॅली अक्षरशः विजयी रॅलीत रूपांतरित झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हाच्या घोषणा, ढोल-ताशांचा गजर आणि कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. रॅलीदरम्यान नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने डॉ. सुलक्षणा शिलवंत-धर यांच्या विजयाची चर्चा नागरिकांमध्ये रंगताना दिसून आली.



## पिंपळे सौदागर-रहाटणी प्रभाग 28 मध्ये

# भाजपाची प्रचार पदयात्रा!

### मिशन – PCMC : भाजपाचे शत्रुघ्न काटे यांच्या पॅनेलची प्रचारात आघाडी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 28 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या प्रचार मोहिमेचा उद्या भव्य प्रारंभ होणार आहे. भाजपाचे शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखालील पॅनेल या पदयात्रेत आघाडी घेत आहे, तर त्यांच्या पॅनेलमध्ये काटे अनिता संदीप (सर्वसाधारण – महिला), भिसे कुंदा संजय (सर्वसाधारण – महिला) आणि काटे संदेश रामचंद्र (सर्वसाधारण) यांचा समावेश आहे.**




पदयात्रा सकाळी ९:०० वाजता पिंपळे सौदागर येथून सुरू होईल. याचा मार्ग स्वराज गार्डन चौक, सेव्हन स्टार लेन, गोविंद गार्डन रोड, कुणाल आयकॉन रोड, शिवार चौक, कोकणे चौक, रहाटणी चौक पार करून विमल गार्डन चौक येथे संपेल. पक्षाने सांगितले की, पदयात्रेदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधून, स्थानिक समस्या आणि प्रभागातील विकास विषयक मुद्दे मांडले जातील.

भाजपकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, 'कमळ' चिन्हासमोर बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करा. मतदान गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत होणार आहे.

पक्षाचे स्थानिक नेते म्हणाले की, पदयात्रा ही फक्त प्रचाराची मोहीम नाही, तर प्रभागातील लोकांचा सहभाग वाढवण्याचा आणि विकासाचे मुद्दे जनतेसमोर आणण्याचा मार्ग आहे. त्यांनी नागरिकांना सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले असून, पदयात्रेत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याचे सांगितले. भाजपच्या या मोहिमेमुळे प्रभागातील वातावरण उत्साही आणि जोमाने भरलेले असून, पक्षाचे उमेदवार प्रभागातील प्रत्येक घरपोच पोहोचून जनतेशी संवाद साधत आहेत.

> “प्रत्येक नागरिकाचा आवाज ऐकणे आणि प्रभागातील विकासाला गती देणे हा माझा प्रमुख उद्देश आहे. आपण एकत्र आहोत, तर बदल शक्य आहे. ‘कमळ’ चिन्हावर मतदान करून आपली साथ द्या, आपण एकत्र प्रभागाला नवी उंचीवर घेऊन जाऊ!”
> **—शत्रुघ्न सिताराम काटे,** उमेदवार, भाजपा, प्रभाग- 28.

## राष्ट्रवादी काँग्रेसची विजय संकल्प सभा उत्साहात

### मिशन- PCMC : विकास, न्याय आणि सक्षम नेतृत्वासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला मतदान करण्याचे आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने आयोजित करण्यात आलेली विजय संकल्प सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेत मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांना मार्गदर्शन करत आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस पाठिंबा देण्याचे आवाहन केले.**




यावेळी प्रभाग क्र. ५ मधील अधिकृत उमेदवार श्रीम. भिमाबाई पोपट फुगे, श्री. अमर परशुराम फुगे, श्री. प्रियंका प्रविण बारसे, ॲड. राहुल बाळासाहेब गवळी तसेच प्रभाग क्र. ७ मधील अधिकृत उमेदवार श्री. विराज विश्वनाथ लांडे, श्रीम. अनुराधा सुशिल लांडगे, श्रीम. अश्विनी निलेश फुगे, श्री. अमोल मधुकर डोळस यांच्या प्रचारासाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती.

मा. अजितदादा पवार यांनी आपल्या भाषणात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम आणि अनुभवी नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे सांगितले. पिंपरी-चिंचवडमधील नागरी समस्या, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, वाहतूक, आरोग्य व शिक्षण या विषयांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सातत्याने काम केल्याचे त्यांनी अधोरेखित केले. “न्याय, हक्क आणि विकासाच्या लढाईत राष्ट्रवादी काँग्रेस सदैव नागरिकांच्या पाठीशी उभी आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले.

सभेला मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. उपस्थितांमध्ये आगामी निवडणुकीबाबत उत्साहाचे वातावरण दिसून आले. यावेळी नागरिकांना आवाहन करताना सांगण्यात आले की, १५ जानेवारी रोजी ‘घड्याळा’च्या चिन्हासमोरील बटण दाबून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करा आणि नागरी समस्यांमधून कायमची सुटका मिळवा.

## मिशन- PCMC : प्रभाग क्र. 7 मध्ये

# ‘दादां’चा शब्द अन् विकासाची साथ!

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) प्रचाराचा झंझावात!



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“परिवर्तनाचा बुलंद आवाज... विजयी निर्धार!” या घोषणांनी पिंपरी-चिंचवडमधील प्रभाग क्रमांक ७ सध्या अक्षरशः दुमदुमून गेला आहे. पुणे जिल्ह्याचे भाग्यविधाते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या ‘विजयी निर्धार सभे’नंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या प्रचाराला प्रचंड गती मिळाली आहे. ही सभा केवळ निवडणुकीची घोषणा न राहता, प्रभागाच्या सर्वांगीण परिवर्तनाचा एल्गार ठरली आहे.**

प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी उमेदवारांनी अजितदादांच्या मार्गदर्शनाखाली ‘अष्टप्रधान संकल्पना’ मांडली आहे. या विकास आराखड्यात पाणीपुरवठा, पायाभूत सुविधा, स्वच्छता, रोजगारनिर्मिती, सुरक्षा, महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि शिक्षण या आठ प्रमुख मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे.

शुद्ध व समान पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते व उद्याने, स्वच्छ व हरित प्रभाग, युवकांसाठी कौशल्यविकास व रोजगाराच्या संधी, महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना, आत्मनिर्भर महिलांसाठी आर्थिक बळ, परवडणारी हायटेक आरोग्यसेवा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण सुविधा हे या संकल्पनेचे ठळक पैलू आहेत. माजी नगरसेविका सुरेखाताई लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली विकास कॉलनी, शांतीनगर तसेच परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये होम-टू-होम प्रचार राबवण्यात येत आहे. उमेदवारांनी नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. ज्येष्ठ नागरिकांपासून तरुणांपर्यंत सर्व स्तरांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांबाबत उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

“आम्ही केवळ आश्वासने द्यायला आलो नाही, तर अजितदादांनी दिलेला विकासाचा वचननामा घेऊन आलो आहोत. हा जाहीरनामा पिंपरी-चिंचवडच्या प्रगतीचा खरा आराखडा आहे,” अशी ठाम भूमिका उमेदवारांनी मांडली.

#### महिला वर्गाचा खंबीर पाठिंबा..

प्रचारादरम्यान महिलांनी उमेदवारांचे उत्स्फूर्त स्वागत केले. ‘घड्याळ’ चिन्हाचे सर्व उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील, असा विश्वास अनेक ठिकाणी नागरिकांनी व्यक्त केला. अजितदादांच्या जाहीरनाम्याचे वाटप करत विकासकामांची सविस्तर माहिती मतदारांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. प्रभाग क्रमांक ७ मध्ये सुरू असलेल्या या जोरदार प्रचारामुळे विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ने विजयाच्या दिशेने आपली पकड अधिक मजबूत केल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसत आहे.

# भोसरीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत भाजपाची दमदार प्रचार रॅली

### मिशन- PCMC: आझाद नगर–चऱ्होली परिसरात सायंकाळी संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीकडून प्रचाराला वेग आला असून, महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत भोसरी येथे भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.**

या प्रचार रॅलीत दमदार आमदार श्री. महेशदादा लांडगे, पिंपरी-चिंचवड शहराचे मा. महापौर व प्रभाग क्रमांक तीनचे उमेदवार श्री. नितीनआप्पा काळजे, पिंपरी-चिंचवड शहर भाजपाचे कोषाध्यक्ष श्री. सचिनभाऊ तापकीर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे प्रभागातील सर्व भावी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात रॅलीने भोसरी परिसरात जोरदार शक्तिप्रदर्शन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विकास, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकाभिमुख धोरणांवर भर दिला. पिंपरी-चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भाजपाला पुन्हा एकदा संधी देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, आज संध्याकाळच्या सत्रात आझाद नगर, दाभाडे वस्ती, चऱ्होली परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये प्रचाराच्या अनुषंगाने संवाद दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. स्थानिक नागरिकांनीही या संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत भाजपाच्या विकासात्मक भूमिकेवर विश्वास व्यक्त केला. एकूणच, भोसरीतील प्रचार रॅली आणि आझाद नगर–चऱ्होलीतील संवाद दौऱ्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपाने आपली ताकद आणि संघटनशक्ती प्रभावीपणे दाखवून दिली आहे.